# शब्बाथाचा झरा



एड्रियन एबन्स

शब्बाथाचा झरा
एप्रिल २०१६ मध्ये लिखित, नोव्हेंबर २०२५ मध्ये अद्यतनित
कॉपीराइट © २०२५, एड्रियन एबन्स
Maranathamedia.com
लेखकाचा नैतिक हक्क सुरक्षित आहे.

हे पुस्तक आणि इतर सर्व Maranatha Media प्रकाशने आमच्या संकेतस्थळावर maranathamedia.com येथे उपलब्ध आहेत. अधिक प्रती मागवण्यासाठी कृपया येथे संपर्क करा:

हे पुस्तक
लिखित: एड्रियन एबन्स
संपादित व शुद्धलेखन: एड्रियन एबन्स
मुखपृष्ठ रचना: एड्रियन एबन्स
टाइपसेट: 10.5/14 Palatino Linotype

जोआन इसाक यांच्या प्रेमळ स्मरणार्थ त्या काही कठीण काळात इस्राएलमधील एका आईप्रमाणे होत्या. मी त्याबद्दल सदैव कृतज्ञ आहे. धर्मीच्या पुनरुत्थानात आम्ही तुम्हाला पुन्हा भेटू, अशी आमची आशा आहे.

ही पुस्तिका शब्बाथाचे एक पूर्णपणे नवे रूप मांडते एका झऱ्यामधून ओतल्या जाणाऱ्या पवित्र आत्म्याच्या देणगीप्रमाणे, जी आपल्याला या विशेष वेळांमध्ये दिली जाते. या झऱ्याच्या केंद्रस्थानी पित्याचे आपल्या पुत्रावरील प्रेम आहे. यामुळे आपल्यासमोर मेजवानींच्या प्रश्नाचे एक वेगळे चित्र उघडते या केवळ कायदेशीर मागण्या नसून, आत्म्याच्या व आशीर्वादांच्या त्या ऋतू आहेत जी देवाची मुले म्हणून आपल्याला ताजेतवाने करतात, आणि पिता आपल्यावर करीत असलेल्या अगापे प्रेमाची आठवण करून देतात.

विश्वास, आशा आणि प्रेमाने,
एड्रियन एबन्स

MARANATHA
MEDIA

**November, 2025**

पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी ह्यांनी केले आहे. तसेच पुनर्वाचनासाठी ताई वोइलेट डिसोझा ह्यांनी मदत केली आहे.

# अनुक्रमणिका

पित्याच्या आनंदाचे आशीर्वाद....4
पापामुळे पुत्रत्वाची हानी....7
बलिदानाशिवाय शब्बाथ नाही....10
नियमशास्त्रातील सुवार्ता....13
वाहणाऱ्या झऱ्यासारखे....17
ताजेतवाने होण्याचे ऋतू....19
आशीर्वादाचे मोठेपण....21
शब्बाथ अधिक पूर्णपणे....26
मध्यरात्रीची हाक....30
अंधकारातून बोलावलेले....33
ओळखीचे युद्‌ध....35
संपूर्ण जगाला सांगा....36
आशीर्वाद....38
एलीयाचे पुनरागमन आणि जीवनाचे महत्त्व....41
दैवी नमुना....43
शब्बाथाचा दैवी नमुना....46
शब्बाथाच्या नियुक्त वेळांवर आधारित संदेश....49

# पित्याच्या आनंदाचे आशीर्वाद

“अखिल पृथ्वी परमेश्वराचे भय धरो; जगात राहणारे सर्व त्याचा धाक बाळगोत. कारण तो बोलला आणि अवघे झाले; त्याने आज्ञा केली आणि सर्वकाही स्थिर झाले.” स्तोत्र ३३:८–९

जिवंत देवाच्या पुत्राला महान शिल्पकाराला या जगाला बोलून अस्तित्वात आणताना पाहण्याचे भाग्य ज्या देवदूतांना लाभले असेल, ते अनुभव किती आश्चर्यकारक आणि अद्‌भुत असतील!

“आणि ज्याने [येशू ख्रिस्ताद्‌वारे] सर्वकाही निर्माण केले त्या देवाच्या ठायी युगादिकालापासून गुप्त राहिलेल्या रहस्याची व्यवस्था काय, हे सर्वांना प्रकाशित करून दाखवावे;” इफिसकर ३:९

“प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभी देवासह होता. सर्वकाही त्याच्या द्‌वारे झाले आणि जे काही झाले ते त्याच्यावाचून झाले नाही.” योहान १:१–३

येशू हा देवाचे वचन होता देवाचा विचार ऐकू येईल असा बनलेला. “तो मनुष्यांना आणि देवदूतांना देवाचे प्रगटीकरण करणार होता. तो देवाचे वचन होता, देवाचा विचार ऐकू येणारा असा.” (युगायुगाची आशा), पान १९

देवपुत्र हा देवाचे वचन आहे देवाचा विचार ऐकू येणारा असा. पित्याची संपूर्ण निर्मितीची शक्ती जगाला बोलून अस्तित्वात आणण्यासाठी त्याच्या पुत्राला दिली गेली.

विश्वाचा सर्वोच्च अधिपती आपल्या उपकाराच्या कार्यात एकटा नव्हता. त्याच्याकडे एक सहकारी एक सहकर्मी होता जो त्याच्या उद्‌देशांचा आदर करीत असे, आणि जो सृष्टीला आनंद देण्याच्या त्याच्या आनंदात सहभागी होऊ शकेल. “प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभी देवासह होता” योहान १:१–२ ख्रिस्त, शब्द देवाचा एकुलता एक जन्मलेला पुत्र हा सनातन पित्याशी एक होता: स्वभावात, गुणवैशिष्ट्यात, उद्‌देशात आणि हा एकमेव अस्तित्व होता जो देवाच्या सर्व सल्लामसलती आणि उद्‌दिष्टांमध्ये संपूर्णपणे सहभागी होऊ शकत

होता. (Patriarchs and Prophets),(कुलपिता आणि संदेष्टे) पान ३४

जसा ख्रिस्त आपल्या पित्याचे शब्द बोलत होता, तसे हे जग निर्माण होत होते. गवत, झाडे आणि फुले बोललेल्या वचनाद्वारे भूमीतून उगवत होती, आणि ते पाहून पिता आपल्या पुत्राकडे वळून म्हणत असे, "हे चांगले आहे, पुत्रा."

"जलांनी त्याची आज्ञा उल्लंघू नये म्हणून जेव्हा त्याने समुद्राला मर्यादा घालून दिली; जेव्हा त्याने पृथ्वीचे पाये रेखले; तेव्हा मी त्याच्याजवळ कुशल कारागीर होते; मी त्याला नित्य आनंददायी होते; त्याच्यासमोर मी सर्वदा हर्ष पावत असे;" नीतिसूत्रे ८:२९–३०

निर्मितीच्या त्या प्रत्येक दिवशी देवपुत्राला आपल्या पित्याचा त्याच्यामध्ये असलेला आनंद जाणवत होता. सृष्टीच्या प्रक्रियेदरम्यान देवपुत्र आपल्या पित्याच्या आशीर्वादात आनंदित होत होता. प्रत्येक दिवस जसजसा पुढे जात होता, तसतसे पित्या-पुत्राचे आनंद आणि हर्ष अधिकाधिक वाढत होते. जेव्हा त्यांनी आदाम आणि हव्वाला त्यांच्या आजूबाजूच्या अद्भुत सृष्टीकडे विस्मयाने पाहताना पाहिले, तेव्हा पिता आणि पुत्र दोघांनाही आपल्या उदार भेटीबद्दल अत्यानंद झाला.

ते त्यांच्या अगापे प्रेमात एकत्र आनंदित झाले. मग शेवटी शब्बाथ आला. पिता निर्माणकार्याकडे पाहत असताना डोंगर, दऱ्या, नद्या, आणि पृथ्वीवर फिरणाऱ्या सर्व सजीवांकडे पाहताना त्याने आनंदाने आपल्या पुत्राला सांगितले:

"तू माझा प्रिय पुत्र आहेस, आणि तुझ्याविषयी मी फार संतुष्ट आहे."

या दिवशी देवपुत्र आपल्या पित्याने आशीर्वादित झाला. सर्वोच्च परमेश्वराचा पवित्र आत्मा त्याच्यावर विसावला, आणि पुत्र ताजातवाना झाला.

"...सहा दिवसांत आकाश व पृथ्वी निर्माण करून सातव्या दिवशी विसावा घेतला आणि त्याचा श्रमपरिहार झाला." निर्गम ३१:१७

"श्रमपरिहार झाला किंवा ताजातवाना झाला" या हिब्रू शब्दाचा अर्थ म्हणजे श्वास फुंकणे. पुत्रावर पित्याने फुंकलेला हा श्वास म्हणजेच पित्याचा आपल्या पुत्रामध्ये असलेला आनंद. पुत्रानेही आपल्याला दिलेल्या सर्व गोष्टींसाठी आपल्या पित्याची उपासना आणि आदराने प्रत्युत्तर दिले.

"...पित्याचे जीवन सर्वांकडे वाहते; पुत्राद्वारे ते पुन्हा स्तुती आणि आनंदी सेवेतून, प्रेमाच्या भरतीसारखे, सर्वांचा महान स्त्रोत असलेल्या देवाकडे परत जाते." युगायुगाची आशा (Desire of Ages), पान २१

देवाने सातवा दिवस आशीर्वाद देऊन पवित्र केला; कारण सृष्टी निर्माण करण्याचे काम संपवून त्याने त्या दिवशी विसावा घेतला. उत्पत्ती २:३

देवाने शब्बाथामध्ये ठेवलेला आणि प्रत्येक आठवड्यात स्मरण केला जाणारा आशीर्वाद म्हणजे पित्याच्या आनंदामध्ये देवपुत्राने अनुभवलेला तो ताजातवाना करणारा स्पर्श. प्रत्येक सातव्या दिवसाच्या शब्बाथाला देवपिता आपल्या पुत्रावर श्वास फुंकतो त्या आनंदाच्या स्मृतीस्वरूप, जी निर्मिती पूर्ण झाल्यावर त्याने आपल्या पुत्राविषयी अनुभवली होती. आणि जे ख्रिस्तामध्ये आहेत ते या आशीर्वादाचे भागीदार होतात. आपण हा आशीर्वाद ख्रिस्त येशूद्वारे वारसा म्हणून मिळवतो.

"आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो. त्याने स्वर्गातील सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे; त्याचप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेत पवित्र व निर्दोष असावे, म्हणून त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले. त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरता प्रेमाने पूर्वीच नेमले होते." इफिसकर १:३–५

ख्रिस्तामध्ये आपण मिळवू शकणारा सर्वात महान आध्यात्मिक आशीर्वाद म्हणजे आपण पित्याच्या प्रेमात आहोत हे जाणणे. विश्वासाने आपण पाहतो की पिता आपल्या पुत्राला प्रेमाने कवटाळतो, पितृसुलभ स्नेहाने त्याला आलिंगन आणि चुंबन देतो आणि त्याला सांगतो: "तू माझा पुत्र आहेस, आणि तुझ्याविषयी मी फार संतुष्ट आहे!"

अशा शब्दांनी आशीर्वादित झाल्यावर देवपुत्राला त्यापलीकडे पूर्ण आणि परिपूर्ण विश्रांतीशिवाय आणखी काय अनुभवता येणार? तुम्हालाही व्यतिरिक्त काही हवे आहे काय पित्याच्या कुशीत असणे आणि पूर्ण खात्रीने जाणणे की आपण त्याच्या प्रेमात आहोत, आणि त्याच्या आनंदाचे कारण आहोत?

हीच ती परिपूर्णता आहे ते “पूर्ण केलेले कार्य” ज्यामध्ये सुवार्ता आपल्याला आणते.

कारण त्यांच्यासारखी आपल्यालाही सुवार्ता सांगण्यात आली आहे, परंतु ऐकलेले वचन त्यांना लाभदायक झाले नाही; कारण त्याचा ऐकणाऱ्यांमध्ये विश्वासाबरोबर संयोग झाला नाही. त्याची ‘कृत्ये’ जगाच्या स्थापनेपासून समाप्त झाली. तथापि, “त्याप्रमाणे मी रागाने शपथ वाहून म्हणालो, ‘हे माझ्या विसाव्यात निश्चित येणार नाहीत;”’ असे ज्या ‘विसाव्याविषयी,’ त्याने सांगितलेले आहे त्यात, ज्या आपण विश्वास ठेवला आहे ते ‘आपण प्रवेश करत आहोत.’ कारण सातव्या दिवसाविषयी एका ठिकाणी त्याने असे म्हटले आहे की, “सातव्या दिवशी देवाने आपल्या सर्व कृत्यांपासून विसावा घेतला.” इब्री ४:२-४

निर्मितीचे कार्य आणि उद्धाराचे कार्य हे एकच आहेत. या दोन्हींचा उद्देश म्हणजे तुम्हाला पित्याच्या कुशीत आणणे, त्याच्या आलिंगनात विश्रांती देणे, आणि त्याच्यामध्ये संपूर्ण आनंद अनुभवू देणे. ही अनुभूती प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे आपल्यापैकी प्रत्येकासाठी उघडली गेली आहे. आणि जेव्हा प्रत्येक सातवा दिवस आपल्याकडे येतो, तेव्हा आपण त्या. त्याच विश्रांतीत प्रवेश करू शकतो ज्या विश्रांतीचा अनुभव ख्रिस्ताने जगाच्या पायाभरणीपासून घेतला आहे. प्रत्येक शब्बाथदिवशी आपण पित्याचा आपल्याविषयीचा आनंद त्याच्या पुत्राद्वारे अधिक गडद आणि समृद्ध विश्वासाच्या अनुभवातून चाखू शकतो.

आणि यर्दन नदीवर येशूला सांगितलेला तो शब्द “हा माझा प्रिय पुत्र आहे, आणि ह्याच्याविषयी मी फार संतुष्ट आहे” हा मानवजातीला आलिंगन देणारा शब्द आहे. देवाने येशूशी आपला प्रतिनिधी म्हणून बोलले. आपली सर्व पापे आणि दुर्बलता असूनही, आपण तुच्छ म्हणून फेकून दिले जात नाही. “त्याने आपल्याला आपल्या प्रियजनामध्ये स्वीकारले आहे.” इफिसकर १:६ ख्रिस्तावर विसावलेली महिमा ही देवाचे आपल्या विषयी असलेले प्रेम सिद्ध करणारी प्रतिज्ञा आहे. युगायुगाची आशा, पान ११३

हीच ती आशीर्वादाची संपत्ती जी शब्बाथामध्ये अंतर्भूत आहे ख्रिस्ताद्वारे आपल्यामध्ये आणि आपल्या पित्यामध्ये असलेल्या प्रेमबंधनांचे ताजेतवाने करणे व नूतनीकरण करणे. प्रत्येक शब्बाथ आपल्या आत्म्यावर पित्याचे नाव अधिक खोलवर कोरतो त्याच्या मुखातून निघणाऱ्या श्वासाद्वारे. देवाची मुले म्हणून शब्बाथदिवस किती अनमोल आहे! अहो, माझ्या महान उद्धारकर्त्याच्या

स्तुतीसाठी हजारो जिभा असत्या तर किती बरे झाले असते! कारण त्याच्यामध्येच मी माझ्या पित्याच्या आनंदाशी जोडला गेलो आहे; आणि मी प्रियकरामध्ये स्वीकारलेला आहे.

## पापामुळे पुत्रत्त्वाची हानी

हीच अवस्था आदामची होती, त्याच्या पतनापूर्वी. तो देवपुत्राद्वारे पित्याच्या प्रेमाच्या खात्रीमध्ये राहात होता जोपर्यंत नाश करणारा त्यांच्या मध्ये आला नाही. सैतानाने देवपुत्रापुढे स्वतःला नमवण्यास नकार दिला, आणि असे करताना त्याने स्वतःला पित्याच्या आनंदापासून बाहेर काढले. पित्याच्या आनंदाचा आत्मा फक्त त्याच्या पुत्राद्वारे वाहतो. जर आपल्याला पित्याचे आशीर्वाद आणि त्याचा आनंद हवा असेल, तर आपण ख्रिस्त येशूमध्ये असलेल्या त्या झऱ्यामधून पिणे आवश्यक आहे. सैतान जेव्हा ख्रिस्तापासून वळाला तेव्हा त्याने देवाचा पुत्र म्हणून असलेली आपली ओळखही गमावली. पुत्र व्हायचे असेल तर आपल्याला पुत्राकडे पाहणे आवश्यक आहे कारण आपण ज्याकडे पाहतो, त्याच्यासारखे आपण बनतो. सैतानाने देवाप्रती असलेले आपले पुत्रत्त्व नाकारले आणि पित्याची शिक्कामोर्तब ओळख आपल्या मनातून पुसू लागला आणि तिच्या जागी एक असे रहस्य ठेवले की ज्या द्वारे तो स्वतःचीच उपासना करू शकेल.

देवपुत्राच्या श्रेष्ठत्वाला आव्हान देणे यामुळे निर्माणकर्त्याच्या शहाणपणावर आणि प्रेमावर प्रश्न उपस्थित करणे हेच या देवदूताच्या उद्दिष्टाचे केंद्र झाले. या हेतूसाठी त्याने आपल्या त्या प्रभावी बुद्धीच्या शक्तीचा उपयोग करायला सुरुवात केली जी ख्रिस्तानंतर देवाच्या सैन्यात सर्वोच्च मानली जात असे. पण ज्याने आपल्या सर्व सृष्टीच्या इच्छेला स्वतंत्र ठेवले होते, त्याने कोणालाच त्या फसव्या युक्तिवादांच्या आहारी जाऊ दिले नाही, ज्याद्वारे बंडखोरी स्वतःला योग्य ठरवण्याचा प्रयत्न करीत होती. (Patriarchs and Prophets),(कुलपिता आणि संदेष्टे पान ३६ )

जर लूसिफर देवपुत्राच्या आधीनतेत राहिला असता, तर तो ख्रिस्ताद्वारे पित्याचे ते आनंददायी झरे चाखत राहू शकला असता; तो पुत्राच्या आत्म्याद्वारे एक पुत्र म्हणून कायम राहू शकला असता. दुःखाची गोष्ट अशी की त्याने हे नाकारले, आणि आपल्या स्थानापासून दूर जाताच तो निरुपयोगीपणाचा अंधकारात कोसळला.

“सैतान स्वतःच्या नव्या अवस्थेकडे पाहून चकित झाला. त्याचे सुख नाहीसे झाले होते. त्याच्यासोबत एके काळी अत्यानंदाने भरलेले देवदूत जे आता त्याच्यासह स्वर्गातून बाहेर फेकले गेले होते त्यांच्याकडे पाहून त्याचे हृदय खिन्न झाले. त्यांच्या पतनापूर्वी त्यांच्या परिपूर्ण आनंदावर असंतोषाची एकही छाया पडली नव्हती. पण आता सर्वकाही बदललेले दिसत होते. ज्यांच्या मुखांवर त्यांच्या निर्माणकर्त्याचे प्रतिबिंब दिसत होते, त्या सर्व चेहऱ्यांवर आता अंधार आणि निराशा होती. त्यांच्यात फूट, मतभेद, आणि कटु दोषारोप सुरू झाले होते.” स्पिरिट ऑफ प्रॉफेसी, खंड १, पान २८

“स्वर्गातील मधुर प्रकाश हरवल्यानंतर जी दीन अवस्था त्याने अनुभवली, अपराधबुद्धीची वेदना, आणि स्वतःच्या अपेक्षा पूर्ण न झाल्यामुळे निर्माण झालेली निराशा हीच त्याच्या दुःखाची कारणे ठरली.” स्पिरिट ऑफ प्रॉफेसी, खंड १, पान ३०

सैतानातील हा अंधकार आणि निराशा आदाम आणि हव्वामध्येही आली, जेव्हा त्यांनी त्या फळाचा स्वाद घेतला ज्याबद्दल त्यांना न खाण्याची आज्ञा दिली होती. ही अंधारलेली निरुपयोगीपणा त्यांची ओळख हरवल्यामुळे आली. ती हरवली कारण त्यांनी पित्याचा आपल्या पुत्रावर विसावलेला आनंद सोडून दिला. हे होते स्वतःच्या हाताने घडवून आणलेल्या अनाथपणाचे दुःख. आणि हेच नुकसान आणि दुःख आजही अस्तित्वात आहे.

“जो कोणी पुत्राला नाकारतो त्याला पिता लाभला नाही; जो पुत्राला स्वीकारतो त्याला पिता लाभला आहे.” १ योहान २:२३

जेव्हा एखाद्या व्यक्तीला स्वतःची किंमत अल्प किंवा शून्य वाटते, तेव्हा त्यातून आत्मविनाशकारी निरुपयोगीपणा प्रकट होणे कठीण नाही. पाप म्हणजे त्या विश्वासाचे प्रकटीकरण की ज्याने आपल्याला जीवन दिले त्याच्यासाठी आपण मोलाचे नाही. अशीच भावना सर्पाने एदेन बागेमध्ये पेरली.

“कारण देवाला हे ठाऊक आहे की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील. आणि तुम्ही देवासारखे बरेवाईट जाणणारे व्हाल.” उत्पत्ति ३:५

सैतानाने सुचवले की देव आदाम आणि हव्वापासून काहीतरी मौल्यवान लपवत आहे जे त्यांच्यासाठी आशीर्वाद ठरले असते. असा विचार त्यांना या निष्कर्षापर्यंत घेऊन

गेला की देव खरोखरच त्यांना प्रेम करीत नाही. देव आपल्यावर खरोखर प्रेम करीत नाही, हा विचार पापाला जन्म देतो. “आणि पाप जेव्हा वाढून परिपूर्ण होते, तेव्हा मृत्यू निर्माण करते.” याकोब १:१५

म्हणून पापाचा उपाय म्हणजे देवाचे आपल्या विषयी असलेले प्रेम आपल्या पित्याच्या आनंदित प्रेमाचे प्रगटीकरण आपल्याला दाखविणे. हे प्रेम पूर्णत्वाने प्रकट झाले होते एदेन बागेच्या पहिल्या शब्बाथ दिवशी पित्याने आपल्या पुत्राविषयी व्यक्त केलेल्या त्या आनंदामध्ये. म्हणून शब्बाथ हा तो माध्यम आहे ज्याद्वारे पित्याचा आनंदित आत्मा आपले मन पुन्हा जागृत करतो, आणि आपल्याविषयी असलेल्या त्याच्या खऱ्या, नि:स्वार्थी काळजीची आठवण करून देतो. याच दिवशी आपण ख्रिस्तामार्फत पित्याचा श्वास प्राप्त करतो, आणि आपले मन पित्याच्या प्रेमाच्या जाणिवेत पवित्र केले जाते.

आपण पित्याचा परिपूर्ण आशीर्वाद फक्त ख्रिस्ताद्वारेच प्राप्त करू शकतो. आणि कारण ख्रिस्ताचे प्रभुत्व शब्बाथामध्येच प्रकट झाले आहे, त्यामुळे आपण पित्याचा पूर्ण आणि संपूर्ण आशीर्वाद फक्त शब्बाथाद्वारे मिळवू शकतो. म्हणूनच शब्बाथ हा आपल्या देवाचा पवित्र करणारा चिन्ह, किंवा चमत्कार आहे.

“आणखी त्यांच्यामध्ये व माझ्यामध्ये चिन्ह होण्यास मी त्यांना आपले शब्बाथही दिले; ते अशासाठी की मी परमेश्वराने त्यांना पवित्र केले हे त्यांना समजावे.” यहेज्केल २०:१२

आमच्या पुत्रत्वाचा आणि कन्यात्वाचा मुद्दा हा ख्रिस्त आणि सैतान यांच्या मधील संघर्षाचा मुख्य मुद्दा आहे. सैतानाने हे स्पष्टपणे प्रकट केले, जेव्हा त्याने ख्रिस्ताला म्हटले:

“तेव्हा परीक्षक त्याच्याजवळ येऊन म्हणाला, “तू देवाचा पुत्र आहेस तर ह्या धोंड्यांच्या भाकरी व्हाव्यात अशी आज्ञा कर.” मत्तय ४:३

सैतानाने ख्रिस्ताच्या पुत्रत्त्वावर प्रश्न उपस्थित केला विशेषतः ते कसे सिद्ध होते यावर. पित्याने ख्रिस्ताला ४० दिवस पूर्वीच सांगितले होते की तो त्याचा प्रिय पुत्र आहे. आता प्रश्न होता: ख्रिस्त पित्याच्या वचनावर विश्वास ठेवणार काय? की आपल्या सामर्थ्याने ते सिद्ध करण्याचा प्रयत्न करणार? ख्रिस्ताने पित्याच्या

वचनात विश्रांती घेतली आणि विश्वासाने मान्य केले की देव खरोखरच त्याचा पिता आहे. जर त्याने स्वतःला पुत्र सिद्ध करण्याचा प्रयत्न केला असता, तर त्याचा अर्थ झाला असता की तो देवाच्या वचनावर विश्वास ठेवत नाही.

जसा देवपुत्राने निर्मितीच्या पहिल्या शब्बाथदिवशी आपल्या पित्याच्या आशीर्वादाचे शिक्कामोर्तब प्राप्त केले, तसेच आपणही शब्बाथद्वारे देवाची पुत्र आणि कन्या म्हणून पूर्णपणे पुनर्स्थापित आणि शिक्कामोर्तब केले जातो. म्हणूनच शब्बाथ हे अंतिम संकटामध्ये महान परीक्षेचे केंद्रबिंदू ठरेल.

## बलिदानाशिवाय शब्बाथ नाही

दर आठवड्याला शब्बाथ दिवशी येऊन पित्याचा आशीर्वाद घेणे, आणि पित्याच्या आपल्या मुलांवरील आनंदाची पुनर्स्थापना सुरू करणे हे आदाम आणि त्याच्या संततीसाठी किती सोपे झाले असते, नाही काय? पण हे शक्य नव्हते. कारण सैतानाने जेव्हा देवाप्रतीचे आपले पुत्रत्त्व सोडले, तेव्हा त्याने ख्रिस्तामध्ये असलेल्या पुत्रत्त्वाच्या आत्म्यालाही नाकारले. प्रत्यक्षात सैतानाने सुरुवातीपासूनच देवपुत्राला नष्ट करायची इच्छा बाळगली होती:

तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे. योहान ८:४४

आदाम जेव्हा सैतानाच्या अधीन गेला, तेव्हा त्याच्यावर अनाथपणाच्या आत्म्याने ताबा मिळवला एक असा आत्मा, जो ख्रिस्ताचा द्वेष करतो, आणि पुत्र म्हणून तो नम्र राहण्याऐवजी, स्वतःला त्याच्या बरोबरीचे मान्य करून घेण्याची इच्छा करतो. जसे सैतानाने सुरुवातीपासूनच म्हटले:

मी मेघांवर आरोहण करीन, मी परात्परासमान होईन; यशया १४:१४

आपण आपल्या हृदयाचे नैसर्गिक स्वरूप देवपुत्राशी विरोधात (युद्धात) आहे, हे मान्य करायला नकार दिला तर पित्याचा आनंद आपण प्राप्तच करू शकत नाही.

देव आपल्यावर प्रेम करतो, हे सत्य आहे; पण आपण त्याचे प्रेम स्वीकारूच शकत नाही जोपर्यंत आपण पुन्हा पुत्रत्त्वामध्ये परतत नाही. म्हणून शब्बाथाच्या विश्रांतीत प्रवेश करायचा असेल, तर प्रथम आपल्याला हे मान्य करावे लागेल की स्वभावतः आपण देवपुत्राच्या मृत्यूसाठी जबाबदार आहोत. पहिले व्हायची इच्छा, इतरांपेक्षा अधिक श्रेष्ठ असल्याचे सिद्ध करण्याची धडपड, स्वतःची क्षमता आणि शक्ती दाखवून स्वतःला महत्त्व देण्याचा प्रयत्न हे सर्व काही अखेरीस देवपुत्राचा नाश करण्याच्या प्रवृत्तीशीच जोडलेले आहे. म्हणून परमेश्वर असे म्हणतो:

परमेश्वर म्हणतो, “ज्ञान्याने आपल्या ज्ञानाचा अभिमान बाळगू नये; बलवानाने आपल्या बळाचा व श्रीमंताने आपल्या श्रीमंतीचा अभिमान बाळगू नये; बाळगायचा असला तर, मी दया करणारा व पृथ्वीवर प्रेमदया, न्याय आणि नीतिमत्ता चालवणारा परमेश्वर आहे, ह्याची त्याला जाणीव आहे, ओळख आहे, ह्याविषयी बाळगावा; ह्यात मला संतोष आहे, असे परमेश्वर म्हणतो.” यिर्मया ९:२३–२४

आपल्या स्वतःच्या शहाणपणात, पराक्रमात किंवा संपत्तीमध्ये अभिमान करणे म्हणजे पित्याला ओळखण्यात अभिमान न करणे. हे म्हणजे असे न मानणे की सर्व काही त्याच्याकडूनच येते. देवपुत्र मात्र सतत त्या स्थितीत राहतो ज्यात तो मान्य करतो की त्याच्याकडे जे काही आहे ते संपूर्णपणे पित्यापासून आहे.

ह्यावरून येशूने त्यांना उत्तर दिले : मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, पुत्र पित्याला जे काही करताना पाहतो त्यावाचून त्याला स्वतः होऊन काहीही करता येत नाही; कारण जे काही तो करतो ते पुत्रही तसेच करतो. योहान ५:१९

कारण ज्याला देवाने पाठवले तो देवाची वचने बोलतो; कारण देव तो आत्मा मोजूनमापून देत नाही. पिता पुत्रावर प्रीती करतो आणि त्याने सर्वकाही त्याच्या हाती दिले आहे. योहान ३:३४–३५

म्हणून पित्याचा आनंद आपल्या आत प्राप्त करणे अशक्य आहे जर आपण त्याच्याकडे त्याच्या पुत्राच्या आत्म्याने आलो नाही तर. हे करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे हे मान्य करणे की आपल्या स्वभावात आपण देवपुत्राविरुद्ध युद्ध केले आहे; आणि आपली वृत्ती व वर्तन असे आहे की संधी मिळाली असती, तर आपणही पुत्राचा वध केला असता.

आपण ही कबुली कशा प्रकारे देतो? ख्रिस्ताने आपल्या ठायी स्वीकारलेल्या मृत्यूची अंगीकारणी करून. जेव्हा आपण मान्य करतो की तो आपल्या अपराधांसाठी जखमी झाला, आणि आपल्या पापांसाठी चिरडला गेला, तेव्हा पित्याच्या मंदिराचे दरवाजे आपल्यासाठी उघडतात त्याचा आशीर्वाद घेण्यासाठी. प्रत्येक स्वार्थी इच्छा देवपुत्राला जखमी आणि यातनाग्रस्त करते. आपण केवळ एवढेच मानून चालू शकत नाही की येशूने २००० वर्षांपूर्वी आपल्यासाठी दुःख सोसले. कारण “आजही” तो आपल्याला म्हणतो, “जर तुम्ही त्याचा आवाज ऐकलात, तर तुमची मने कठोर बनवू नका.” (स्तोत्र ९५:७–८; इब्री ३:७–८) आजही तो जखमी होतो, आजही तो आपल्या स्वार्थामुळे यातना भोगतो, आजही तो मनुष्यांकडून तुच्छ मानला आणि नाकारला जातो आहे. जेव्हा आपले डोळे या सत्याकडे उघडतात, तेव्हाच आणि फक्त तेव्हाच आपण खऱ्या शब्बाथाच्या अनुभवात प्रवेश करू शकतो.

महत्त्वाचा मुद्दा असा आहे की ख्रिस्ताचे बलिदान स्वीकारल्याशिवाय शब्बाथाची विश्रांती प्राप्त करणे अशक्य आहे. जो मनुष्य एकीकडे ख्रिस्तामध्ये विश्रांती घ्यायचा प्रयत्न करतो आणि त्याचवेळी त्याला पुन्हा क्रूसावर चढवितो आणि त्याला उघडपणे लज्जास्पद ठरवितो, तो कधीही विश्रांती शोधू शकत नाही. (इब्री ६:६) म्हणूनच आपण परमेश्वरासमोर रिकाम्या हाताने हजर होऊ शकत नाही. (निर्गम २३:१५) आपल्याकडे एक अर्पण असणे आवश्यक आहे. आणि आपले अर्पण म्हणजे तुटलेले आणि खेदयुक्त हृदय, नम्र आणि खचलेला आत्मा (स्तोत्र ५१:१७) आपल्या स्वभावातील स्वार्थ आणि त्यामुळे ख्रिस्ताविषयी असलेले नैसर्गिक वैर कबूल करणे. बलिदान आणि शब्बाथ हे सदैव एकत्र बांधलेले असतात. एक माध्यम दुसऱ्यात प्रवेश देते. देवाची पुत्र आणि कन्या म्हणून आपली ओळख हिसकावून घेण्यासाठी चाललेल्या युद्धाच्या प्रकाशात ही सत्ये स्पष्ट वाटतात. जोपर्यंत आपण हे मान्य करत नाही की आपल्या पापी अवस्थेत आपण देवपुत्राला पायाखाली तुडवीत आहोत, तोपर्यंत आपण कधीही खऱ्या पुत्रत्वामध्ये प्रवेश करू शकत नाही. जोपर्यंत आपण आपल्या कारणाने पुत्राने सोसलेल्या दुःखाची कबुली देत नाही, तोपर्यंत आपण पुत्र होऊ शकत नाही; त्याऐवजी आपण निरुपयोगी अनाथांसारखे राहतो जे पाप थांबवू शकत नाहीत; कारण पाप म्हणजे हरवलेल्या पुत्रत्वाचा पुरावा. हे त्या सत्याचे प्रमाण आहे की आपण पित्याच्या खऱ्या प्रेमात विश्रांती घेत नाही.

या सर्व विचारांच्या प्रकाशात शब्बाथ पापाच्या उपायासाठी आशेचा दीपस्तंभ बनतो. जेव्हा आपण क्रूसावर खिळलेल्या तुटलेल्या तारणाऱ्याकडे पाहतो, तेव्हा आपली

दुष्ट वासना त्याच्यावर काय परिणाम घडवून आणते हे दिसते; आणि मग आपण पश्चात्तापाने देवाकडे वळतो आणि ख्रिस्ताचा आशीर्वाद घेतो, आणि पित्याने आपल्या पुत्रासाठी ठेवलेल्या गोड आनंदाचा थोडासा स्वाद चाखतो. आपण प्रियकरामध्ये स्वीकारलेले होतो, आणि ख्रिस्ताजवळ असलेल्या सर्व आध्यात्मिक आशीर्वाद विश्वासाद्वारे आपले होतात. देवाचे पुत्र व कन्या म्हणून जेव्हा आपण त्याच्या प्रेमाविषयीची शंका दूर करतो, तेव्हा आपण पाप करणे थांबवतो. कारण आपण परिपूर्ण आनंदात विश्रांती घेतो हे खात्रीने जाणून की पिता सदैव आपल्यावर प्रेम करील, आपल्याला जपेल, आणि आपल्या भल्यासाठीच कार्य करील.

किती मौल्यवान विचार! ख्रिस्तामध्ये आणि त्याच्या शब्बाथामध्ये आपल्याला किती उच्च, स्वर्गीय दिलासा मिळतो! शब्बाथदिवशी आपल्याला दिसते की ख्रिस्ताचा आत्मा देवाच्या सिंहासनातून अविरतपणे ओतला जातो पित्याचा आनंद घेऊन आणि त्या प्रत्येक ह्रदयात प्रवेश शोधतो जे त्याला मान्यता देण्यासाठी उघडे आहेत. जे ख्रिस्ताचे बलिदान स्वीकारतात आणि नंतर त्याच्या आज्ञांना आलिंगन देतात, ते स्वतःला शब्बाथाशी जोडतात; आणि विश्वासाने देवाच्या पुत्रत्त्व आणि कन्येच्या संपूर्ण परिपूर्णतेत प्रवेश करतात. प्रत्येक शब्बाथदिवशी आपण पित्याच्या आपल्या पुत्रावरील आनंदाशी जोडले जातो. ज्या पित्याच्या बाहुत तो पुत्राला कवटाळतो, तोच बाहू आपणासही वारशात मिळतो. पुत्राचा आनंद आणि हर्ष प्रत्येक शब्बाथाला आपल्याही अनुभवात उतरतो.

आपल्याला कळते की सुवार्तेच्या केंद्रस्थानी असलेला क्रूस आणि नियमशास्त्राच्या केंद्रस्थानी असलेला शब्बाथ एकमेकांना चुंबन देतात आणि आपल्यावर पित्याचा आनंद ओततात ज्यामुळे आपण उद्गारतो:

आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतिदान दिले आहे पाहा; आणि आपण तसे आहोतच. ह्यामुळे जग आपल्याला ओळखत नाही, कारण त्याने त्याला ओळखले नाही. प्रियजनहो, आपण आता देवाची मुले आहोत; आणि पुढे आपण काय होऊ हे अजून प्रकट झालेले नाही; तरी तो प्रकट होईल तेव्हा आपण त्याच्यासारखे होऊ हे आपल्याला माहीत आहे, कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दिसेल. १ योहान ३:१–२

तो आत्मा स्वत: आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो की, आपण देवाची मुले आहोत; रोमकरांस ८:१६

सुवार्ता म्हणजे काय? तर ती पित्याचे हे प्रगटीकरण आहे की कधी आणि कशा प्रकारे तो आपल्या जवळ येतो आणि आपल्याला सांगतो की आपण त्याच्यासाठी किती अनमोल आहोत आणि तो आपल्यावर किती प्रेम करतो.

## नियमशास्त्रातील सुवार्ता

आदीपासूनच प्रभूने पितृजणांना त्या "ताजेतवाने करणाऱ्या ऋतूंचे" प्रकटीकरण केले होते ज्या काळात पित्याचा आनंद ख्रिस्तामध्ये प्रकट होणार होता. जेव्हा पितृजण नियोजित वेळी विश्वासाने कोकरू अर्पण करीत, तेव्हा ते ख्रिस्ताच्या आत्म्याशी जोडले जात, आणि या आत्म्यामध्ये पित्याचा आनंद वास करत असल्याने त्या आत्म्याच्या मार्गदर्शनाखाली चालताना ते देवाची संताने असल्याचे त्यांना पुष्टी मिळत असे.

कारण जितक्यांना देवाचा आत्मा चालवत आहे तितके देवाचे पुत्र आहेत. रोमकरांस ८:१४.

परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला; योहान १:१२.

सैतानाने लगेचच देवाने आपल्या मुलांना आशीर्वाद देण्यासाठी नेमून दिलेल्या काळांचा आणि बलिदानांचा विपर्यास करण्यास सुरुवात केली. इस्राएल मिसरमधून बाहेर आल्यानंतर ख्रिस्ताने मोशेला परमेश्वराच्या आज्ञा, नियम आणि न्यायधर्माद्वारे सुवार्तेचे संपूर्ण स्पष्टीकरण पुन्हा दिले जे मिसरमध्ये राहताना हरवले गेले होते. शास्त्र अब्राहामाविषयी म्हणते:

कारण अब्राहामाने माझा शब्द मानला, माझे सांगणे ऐकले, माझ्या आज्ञा, माझे नियम व माझे कायदे पाळले. उत्पत्ती २६:५.

मोशे जेव्हा पर्वतावर होता, तेव्हा देवाने त्याला फक्त नियमांच्या पट्ट्याच दिल्या नाहीत, तर तारणयोजनेचाही संपूर्ण आराखडा त्याला दाखविला. त्याने पाहिले की ख्रिस्ताच्या बलिदानाचे पूर्वचित्रण यहूदी युगातील सर्व प्रकार व प्रतीकांमध्ये केले गेले होते; आणि कालवरीवरून ओघळणारा स्वर्गीय प्रकाश जो देवाच्या नियमाच्या

तेजाइतकाच गौरवशाली होता मोशेच्या चेहऱ्यावर झळकणाऱ्या त्या दिव्य प्रकाशाचे कारण ठरला. पितृपुरुष आणि संदेष्टे, पृष्ठ ३३०.

मोशेच्या चेहऱ्यावर जो प्रकाश चमकत होता तो केवळ एखादा "प्रतीकात्मक प्रकाश" नव्हता; तो खरा प्रकाश होता, ज्यामुळे इस्राएली लोकांनी मोशेला आपला चेहरा झाकण्याची विनंती केली. हा प्रकाश त्याला दिसलेल्या विश्वासाने पाहिलेल्या कालवरीवरील दर्शनातून आला होता, आणि पित्याने शब्बाथ आणि क्रूसाद्वारे आपल्या मुलांना स्वतःशी कसे जोडले आहे हे त्याने पाहिल्यामुळेही.

परमेश्वराने मोशेला राष्ट्रासाठी बलिदान अर्पण करण्याच्या ठराविक वेळ, दिवस आणि प्रसंग स्पष्टपणे सांगितले होते. हे विशेषतः मोशेच्या नियमशास्त्रात आढळते.ती बलिदाने आणि त्यांची वेळ दोन्ही अत्यंत महत्वाची होती. कारण ज्या क्षणी बलिदान अर्पण केले जायचे, त्या वेळेत पित्याच्या आशीर्वादाचा तो मार्ग खुला व्हायचा जसा प्रथम शब्बाथाच्या दिवशी त्याने आपल्या पुत्रावर आपला आशीर्वाद ओतला तसा.

चला, आता आपण पाहूया की नियमशास्त्राप्रमाणे बलिदाने कोणत्या वेळांना अर्पण करायची होती.

सकाळ-संध्याकाळ परमेश्वराचे नित्य उपकारस्मरण व स्तवन करण्यास त्यांना उभे राहावे लागत असे. तसेच शब्बाथाच्या व चंद्रदर्शनाच्या दिवशी व नेमलेल्या पर्वणीस ठरवलेल्या संख्येप्रमाणे नेहमी परमेश्वरासमोर उभे राहून सर्व होमबली त्यांना त्यास अर्पावे लागत. १ इतिहास २३:३०–३१

मग शलमोनाने देवडीसमोर बांधलेल्या वेदीवर परमेश्वराप्रीत्यर्थ होमार्पण केले; मोशेच्या आज्ञेस अनुसरून नित्यविधीप्रमाणे शब्बाथवारी, चंद्रदर्शनी आणि बेखमीर भाकरीचा सण, सप्तकांचा सण व मांडवांचा सण ह्या तीन नेमलेल्या वार्षिक सणांत तो होमबली अर्पण करीत असे. २ इतिहास ८:१२–१३

नियमशास्त्र दर्शवतो की बलिदाने या वेळांना अर्पण केली जात असत:

१. सकाळी

२. संध्याकाळी

३. शब्बाथाला

४. चंद्रदर्शनाला

५. बेखमीर भाकरीच्या सणाला

६. सप्तकांच्या सणाला

७. मंडपाच्या सणाला

सात या संख्येच्या वापरात आपल्याला यज्ञ आणि शब्बाथ यांच्यातला एक सुंदर संबंध आढळतो. खालील तक्त्यामध्ये आपण वार्षिक चक्राच्या शेवटी नियमशास्त्रात नमूद केलेले काही अतिरिक्त सात गोष्टी जोडू.

या बलिदानांची वेळ ही काही बेकारण किंवा अनियमित ठरविलेली नव्हती; उलट ती 'सात' या संख्येशी काळजीपूर्वक गुंफलेली होती ज्यायोगे वेळेच्या सर्व प्रमुख विभागांमध्ये असलेला शब्बाथ 'सात' सिद्धांत प्रकट व्हावा. हा सिद्धांत प्रत्येक दिवसात, प्रत्येक आठवड्यात, प्रत्येक महिन्यात आणि प्रत्येक वर्षात दिसतो. सातवा दिवस तोच दिवस आहे ज्यादिवशी सहा दिवसांचे कार्य पूर्ण झाल्यावर पित्याने आपल्या पुत्रावर आपला आशीर्वाद ओतला. जेव्हा सहा घटकांच्या कालखंडात कार्य संपन्न होते, तेव्हा सातवा घटक हा चिंतनासाठी, पित्याच्या आनंदाचा आस्वाद घेण्यासाठी, आणि देवाची मुले म्हणून आपली ओळख नव्याने जागवण्यासाठी दिलेला काळ असतो.

सातव्या दिवशी देवाने दिलेल्या विशेष सन्मानामुळे, त्याने त्याच्या लोकांना सात संख्या मोजण्याची आज्ञा दिली जेणेकरून ते त्यांच्या निर्माणकर्त्याला विसरू नये ज्याने सहा दिवसांत आकाश आणि पृथ्वी निर्माण केली आणि सातव्या दिवशी विश्रांती घेतली. आध्यात्मिक भेटवस्तू, खंड ३, पृष्ठ ५३.१

| काळ / वेळ | घटना | सहा, सात आणि विश्रांती यांचा सिद्धांत | शास्त्रसंदर्भ |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ७वा तास | नित्य होमबली (दैनिक बलिदान) | सकाळच्या व संध्याकाळच्या होमबलिदानात ६ तासांचे अंतर. ख्रिस्तानेही क्रूसावर ६ तास दुःख सहन केले, त्यानंतर विश्रांती मिळाली. | मार्क १५:२५; १५:३४; प्रेषिते ३:१; स्तोत्र १४१:२; गणना २८:८ |
| ७वा दिवस | शब्बाथ | ६ दिवसांचे कार्य, आणि ७व्या दिवशी विश्रांती. | निर्गम २०:८–१० |
| ७ दिवस | बेखमीर भाकरीचा सण | ७ दिवस अखमिरीकरण (बेखमीरपणा). | लेवी २३:६ |
| ७ आठवडे + १ | सप्तकांचा सण (पेन्तेकॉस्ट) | ७ आठवड्यांची गणना पूर्ण केल्यानंतर सण व विश्रांती. | लेवी २३:१५ |
| ७वा महिना / ७ चंद्रदर्शन | तुतारीचा, प्रायश्चित्तदिवस, मंडपांचा सण (७+१ दिवस) | ६ महिने मोजून, नंतर ७व्या महिन्यात तीन नेमलेले पवित्र सण. | लेवी २३:२४–३९; यशया ६६:२३; २ राजे ४:२३; यहेज्केल ४६:१ |
| ७वे वर्ष | भू-शब्बाथ (भूमीची विश्रांती) | ६ वर्षे शेती, आणि ७वे वर्ष पूर्ण विश्रांती. | लेवी २५:३ |
| ७×७ वर्षे + १ | पन्नासावा | ७×७ (४९ वर्षे) मोजून नंतर | लेवी २५:८–१० |

| | | | |
|---|---|---|---|
| | वर्ष | पन्नासावा वर्ष—स्वातंत्र्य व विश्रांती. | |
| ७×१००० वर्षे | मिलेनियम | १००० वर्षांच्या ६ कालखंडांनंतर, १००० वर्षांची विश्रांती. | प्रकटीकरण २०:६ |

लक्षात घ्या की प्रेरणा आपल्याला फक्त प्रत्येक सातव्या दिवसाचे स्मरण करायला सांगत नाही, तर सात दिवसांनी गणना करायला सांगते. आपल्या पित्याला त्याच्या पुत्रावरील आणि त्याच्याद्वारे आपल्यावरील त्याचे महान प्रेम वेळेच्या प्रत्येक विभागात लिहायचे आहे काय?

## वाहणाऱ्या झऱ्यासारखे

निर्गमाच्या पुस्तकात एक अत्यंत सुंदर दृष्टांत आहे जो बलिदान अर्पण केल्या जाणाऱ्या वेळी काय घडते याची आपल्याला अधिक खोल समज देतो.

निर्गम १७:३–६ पण तेथे लोकांना खूप तहान लागली आणि ते कुरकुर करून मोशेला म्हणाले, "आम्हांला, आमच्या मुलांना व आमच्या गुराढोरांना तहानेने मारून टाकायला तू आम्हांला मिसर देशातून बाहेर का आणलेस?" मोशेने परमेश्वराचा धावा करून म्हटले, "ह्या लोकांना मी काय करू? हे तर मला जवळजवळ दगडमार करायला तयार झाले आहेत." परमेश्वर मोशेला म्हणाला, "तू लोकांच्या पुढे जा, इस्राएलांतील काही वडील माणसे बरोबर घे आणि जी आपली काठी तू नील नदीवर आपटलीस ती हाती घेऊन चाल. पाहा, होरेब डोंगरावरील एका खडकावर मी तुझ्यापुढे उभा राहीन; आणि तू त्या खडकावर काठी आपट म्हणजे त्यातून पाणी निघेल आणि लोक ते पितील." इस्राएलाच्या वडिलांच्या देखत मोशेने तसे केले.

मोशेने ज्यावर प्रहार केला तो खडक तो आपल्यासाठी वध झालेल्या ख्रिस्ताचे प्रतीक होता.

आणि ते सर्व तेच आध्यात्मिक पाणी प्याले. कारण ते आपल्यामागे चालणाऱ्या

आध्यात्मिक खडकातून पीत होते; तो खडक तर ख्रिस्त होता. ह्या गोष्टींविषयी तुम्ही अजाण असावे अशी माझी इच्छा नाही. १ करिंथकरांस १०:४

तेव्हा येशू त्यांना म्हणाला, "तुम्ही सर्व ह्याच रात्री माझ्याविषयी अडखळाल; कारण असा शास्त्रलेख आहे की, 'मी मेंढपाळाला मारीन आणि कळपातल्या मेंढरांची दाणादाण होईल.' मत्तय २६:३१

त्या प्रहार झालेल्या खडकाच्या प्रतीकातून आपण पाहतो की प्रहाराच्या क्षणी जीवनदायी प्रवाह बाहेर येतो. आणि याच सत्याचे दुसरे सामर्थ्यशाली प्रतीक आपल्याला ख्रिस्ताच्या क्रूसावरील मृत्यूत दिसते.

तरी शिपायांतील एकाने त्याच्या कुशीत भाला भोसकला; आणि लगेच रक्त व पाणी बाहेर निघाले. योहान १९:३४

प्रहार झालेला खडक हा ख्रिस्ताचा एक प्रतीक होता; आणि या प्रतीकाद्वारे अत्यंत मौल्यवान आध्यात्मिक सत्ये शिकविली जातात. जसे प्रहार झालेल्या खडकातून जीवनदायी पाणी वाहून आले, तसेच ख्रिस्ताकडून जो "देवाकडून मारला गेला", "आपल्या अपराधांसाठी जखमी झाला", "आपल्या अधर्मांसाठी चिरडला गेला" ( यशया ५३:४–५ ) त्या मधून तारणाचा प्रवाह हरवलेल्या मानवजातीसाठी बाहेर पडतो. पितृपुरुष आणि संदेष्टे, पृ. ४११

वध झालेल्या कोकरूच्या प्रतीकाशी जेव्हा प्रहार झालेल्या खडकाचे प्रतीक जोडले जाते, तेव्हा आपल्याला दिसते की जीवनदायी प्रवाह या सर्व 'सात' वेळांमधून वाहत राहतो. आपण सकाळी उठताना जर ख्रिस्ताच्या बलिदानाला मान्य करतो, तर आपल्यासाठी तो जिवंत प्रवाह उघडतो, आणि ख्रिस्ताद्वारे पित्याचा आनंद आपल्यावर मोकळा होतो. सहा तासांच्या कालखंडानंतर संध्याकाळच्या बलिदानाची आठवण होते. ज्या लोकांनी ख्रिस्ताच्या बलिदानाला मान्य केले आहे आणि थांबून पुन्हा एकदा आठवण केली, त्यांच्या साठी पुन्हा झरा उघडतो, आणि आपण पित्याच्या आपल्यावरील प्रेमाच्या प्रवाहात बुडून जातो.

हे असेच प्रत्येक शब्बाथामध्ये, प्रत्येक चंद्रदर्शनामध्ये, आणि मग त्या त्या नेमलेल्या सणांमध्येही चालते ज्या दिवसांत कोकरू वध करायचे असे. या प्रत्येक

नियोजित वेळेत पिता आपल्या पुत्राद्वारे आपला आनंद आपल्या लोकांपर्यंत पोहोचवतो. आणि जेव्हा आपण पुत्राला मान्य करतो, तेव्हा हे प्रवाह आपल्या हृदयात प्रवेश करतात आणि त्या प्रक्रियेत आपण पवित्र ठरतो; आपल्या विश्रांतीपूर्ण पुत्रत्वामध्ये आपण पाप करणे थांबवतो आणि स्वतःहून लादून घेतलेली अनाथासारखी शून्यता व्यक्त करणे बंद करतो.

जर बलिदानपद्धतीचा उद्देश सहा हजार वर्षांतील केवळ एकमेव घटनेकडे निर्देश करण्यासाठी होता, तर हे वर्षातून एकच कोकरू किंवा सात वर्षांत एकच कोकरू अर्पण करण्यात प्रतिबिंबित झाले नसते काय? परंतु प्रतिदिन, प्रतीआठवडा, प्रतीमहिना आणि प्रत्येक वर्षी अर्पण होणारे बलिदान हेच सुचवते की या वेळांमध्ये प्रेमाचे प्रवाह खरेच वहात होते ज्या वेळेस ही बलिदाने अर्पण केली जात होती. जर या विशिष्ट वेळांना जीवनदायी प्रवाह वाहत नसते, तर हजारो प्राण्यांचा बळी देण्याने बलिदान अर्पण करणाऱ्यांना कोणताही अर्थपूर्ण लाभ झाला नसता. त्या बलिदानांनी केवळ भावी मसीहाच्या शिकवणीला जिवंत ठेवले असते यापलीकडे काहीच नव्हते. परंतु जर असा प्रवाह नसता, तर मोशेच्या चेहऱ्यावर कालवरीवरून येणारा प्रकाश झळकुच शकला नसता, कारण मोशे स्वतः देवाच्या पुत्राच्या बलिदानाद्वारे पित्याच्या आनंदाच्या त्या अमूल्य प्रवाहात जगत होता त्या "जगाच्या प्रारंभापासून वध झालेल्या कोकऱ्याद्वारे. प्रकटीकरण १३:८

जेव्हा आपण शब्बाथाकडे असा काळ म्हणून पाहतो की ज्यावेळी पिता आपल्या पुत्राविषयी आपला आनंद पूर्ण रीतीने व्यक्त करतो, तेव्हा वेळेच्या प्रत्येक अंगामध्ये हा संदेश पाठवण्याची पित्याची इच्छा आहे हे पाहणे इतके अवघड आहे काय? प्रत्येक दिवस, प्रत्येक आठवडा, प्रत्येक महिना, प्रत्येक वर्ष, प्रत्येक सात वर्षे, आणि सात-पट सात वर्षांवर एक अश्या सर्व वेळा पिता आपल्या मुलांना हाक मारतो. नेमलेल्या या वेळांना पित्याच्या प्रेमाचा जीवनदायी प्रवाह अधिकाधिक प्रमाणात आपल्यावर मोकळा होतो. किती मौल्यवान विचार आहे हा! यामुळे शब्बाथ अधिक गोड भासतो आणि मनामध्ये एक पवित्र प्रतीक्षाभाव निर्माण होतो. विचार करून पाहा सकाळी झोपेतून उठून सकाळच्या उपासनास येताना तुमचे हृदय तुम्ही आपल्या पित्यापुढे असे उघडू शकता की त्या वेळेला त्याचा आत्मा खऱ्या अर्थाने तुमच्यावर मोकळा होत आहे आणि तुम्हाला सांगत आहे, "तू माझे लाडके लेकरू

आहेस; तू माझ्या आनंदाचे कारण आहेस." हेच संध्याकाळीही घडते, आणि मग प्रत्येक शब्बाथाला, आणि असेच सतत चालू राहते. हे तुमच्या मनाला हवे आहे काय? मग उठा आणि या प्रेमाच्या नियमांमध्ये चालायला सुरुवात करा!

## ताजेतवाने होण्याचे ऋतू

अनेक जण म्हणतील, "देव माझा पिता आहे आणि मी त्याचा मुलगा/मुलगी आहे हे जाणण्यासाठी मला कोणत्याही 'विशेष वेळेची' प्रतीक्षा करावी लागत नाही. मला हे सारखेच माहित असते प्रत्येक क्षणी, प्रत्येक दिवशी." पण तुम्ही तुमच्या पत्नीला किंवा मुलांना असेच काही सांगाल काय? "आपण एकमेकांना प्रेम करतो हे आम्हाला कधीही सांगता येते, मग आपल्या नात्यातील खासपणाची आठवण ठेवण्यासाठी कोणत्याही विशेष वेळांची गरजच नाही! आपल्या आयुष्यात कोणत्याही वर्षगाठी किंवा विशेष प्रसंगांची काहीही आवश्यकता नाही." एखादी पत्नी आपल्या पतीला असे म्हणते काय? "तुला माहिती आहे की मी तुला प्रेम करते; म्हणून आपल्या नात्याचा आनंद साजरा करायला आपणास कोणत्याही विशेष वेळांची गरज नाही." हे तर स्वयंस्पष्ट सत्य आहे की जीवनातील प्रत्येक गोष्टीसाठी ठरलेले ऋतू असतात. आपण दिवसभर खात बसत नाही ठराविक वेळीच अन्न घेतो. काम, खेळ आणि झोप यांसाठीही ठराविक वेळा आहेत. उपासनेसाठी आपण स्वतंत्र वेळ राखतो, ज्या वेळी इतर सर्व गोष्टी थांबवून आपण देवाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करतो. ही एक बायबलनिश्चित तत्त्वप्रणाली आहे आणि ती पूर्ण रीतीने उघड केलेली आहे.

सर्वांचा काही उचित काळ म्हणून असतो; भूतलावरील प्रत्येक कार्याला समय असतो : उपदेशक ३:१

बायबल आपल्याला सांगते की आपण देवाच्या आज्ञा ऐकून घेतो तेव्हा त्याच्याकडून मिळणारी आपली धार्मिकता समुद्राच्या लाटांसारखी असते:

तू माझ्या आज्ञा लक्षपूर्वक ऐकतास तर बरे होते; मग तुझी शांती नदीसारखी, तुझी

नीतिमत्ता समुद्राच्या लाटांसारखी झाली असती; यशया ४८:१८

लाटा नेहमी समूहाने येतात पहिले उसळी खात पुढे येतात, मग मागे ओसंडून जातात. अगदी ह्याच रीतीने आपल्या पित्याच्या नेमलेल्या वेळा त्याच्या विधींमधून आपल्या जीवनात येतात. प्रत्येक लाट समुद्रकाठी वर येऊन पोहोचते आणि मग हळूच परत महासागरात विलीन होते. व्यापक पातळीवर आणि किनाऱ्यावर वर येते आणि मग परतीच्या भरतीत मागे सरकते. आणि नविनचंद्र व पौर्णिमेला ही भरती अगदी उंचावर येते. निसर्गातील या साऱ्या अद्भुत गोष्टी आपल्याला शिकवतात की आपल्या देवाची धार्मिकता आपल्या जीवनात कशी प्रवाहित होते.

पहा, शास्त्र आपल्याला (विश्रांती) ताजेतवानेपणा कधी येतो याबद्दल काय सांगते:

तेव्हा तुमची पापे पुसून टाकली जावीत म्हणून पश्चात्ताप करा व वळा; अशासाठी की, विश्रांतीचे समय प्रभूजवळून यावेत; प्रेषितांची ३:१९

हे वचन स्पष्ट सांगते की विश्रांतीचे समय असतात हा ग्रीक शब्द बहुवचन आहे म्हणजे फक्त एकच नाही, तर अशा अनेक वेळा आहेत. पापांचे पुसून टाकणे म्हणजेच शिक्का लावण्याच्या कार्याकडे निर्देश आहे; आणि शिक्का लावणे हे शब्बाथाशी निगडित आहे.

शब्बाथ हा निष्ठेची परमोच्च परीक्षा ठरेल; कारण हाच शिक्का विशेष रीतीने विरोधाचा विषय ठरेल. शेवटची परीक्षा लोकांवर आली की, देवाची सेवा करणारे आणि न करणारे यांच्यामध्ये स्पष्ट रेषा आखली जाईल. राज्याच्या कायद्याशी जुळवून घेत खोट्या शब्बाथाचे पालन करणे जे चौथ्या आज्ञेविरुद्ध आहे हे देवाच्या विरोधी शक्तीसमोरील निष्ठेची कबुली ठरेल; पण देवाच्या नियमाचे पालन करून खरा शब्बाथ पाळणे हे निर्मात्याशी खरी निष्ठा असल्याचे प्रमाण ठरेल. ज्यांनी पृथ्वीवरील अधिकारांना शरण जाऊन अधीनतेचे चिन्ह स्वीकारले, त्यांना पशूची खूण मिळेल; तर ज्यांनी दैवी अधिकाराशी निष्ठा दाखवणारे चिन्ह स्वीकारले, त्यांना देवाचा शिक्का मिळेल. महानसंघर्ष, पृ. ६०५.२

येशू आपल्या पवित्र मंदिरात आहे आणि आता आपल्या बलिदानांना, आपल्या प्रार्थनांना, तसेच आपल्या दोषांना आणि पापांना स्वीकारेल आणि इस्राएलाची सर्व

अपराधे क्षमा करेल जेणेकरून तो पवित्रस्थानातून बाहेर पडण्यापूर्वी ती पापे पुसली जावीत. येशू जेव्हा पवित्रस्थानातून बाहेर पडेल, तेव्हा जे पवित्र व धार्मिक आहेत ते तसेच पवित्र व धार्मिक राहतील; कारण त्यांची सर्व पापे आधीच पुसून टाकली गेली असतील, आणि ते जिवंत देवाच्या चरित्राने मुद्रांकित झालेले असतील. अर्ली रायटिंग्स, पृ. ४८

शब्बाथ हा देवाचा शिक्का कसा असू शकतो जोपर्यंत आपण असा विश्वास ठेवत नाही की तो आपल्या आणि त्याच्यामध्ये देवाचा चमत्कार आहे? तो चमत्कार काय आहे? तो देवाच्या मुलाचे वितळलेले हृदय आहे जेव्हा तो पित्याचे शब्द स्वीकारतो, "हा माझा प्रिय पुत्र आहेस ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे." देवाविरुद्धच्या त्याच्या सर्व दुष्टतेला तोंड देत तो हे सत्य स्वीकारतो. तो असा विश्वास करतो की त्याला क्षमा झाली आहे आणि तो ख्रिस्ताद्वारे पित्याच्या कुशीत विसावतो.

## आशीर्वादाचे मोठेपण

निसर्गातील गोष्टी आपल्याला देवाच्या प्रेमाविषयी अनेक रीतींनी सांगतात. समुद्रातील लाट-ओहोटी सूर्य आणि चंद्र यांच्या प्रभावाखाली चालते. नविनचंद्र आणि पौर्णिमेच्या काळात पृथ्वीवरील भरती फार उंच येते. शास्त्रही आपल्याला सांगते की सूर्य आणि चंद्र हे ऋतूंसाठी तयार करण्यात आले:

मग देव बोलला, “दिवस व रात्र ही भिन्न करण्यासाठी आकाशाच्या अंतराळात ज्योती होवोत; त्या चिन्हे, ऋतू, H3259 दिवस व वर्षे दाखवणाऱ्या होवोत; उत्पत्ति १:१४

येथील “ऋतू” हा शब्द हिब्रू म्‌ओएद (moéd)

Strong’s H4150 (H3259) पासून आहे आणि याचा अर्थ: एखादा नेमका निश्चित केलेला काळ; विशेषत: सण किंवा उत्सव.

म्हणूनच सूर्य आणि चंद्र हे देवाने नेमलेल्या वेळा विशेषतः सण किंवा उत्सव, नियुक्त वेळा यांचा निर्धार करण्यासाठी दिले. सर्वांत विलक्षण गोष्ट म्हणजे प्रकटीकरण १२ मधील त्या स्त्रीचे वर्णन:

नंतर स्वर्गात एक मोठे चिन्ह दृष्टीस पडले ते हे : एक स्त्री दिसली, ती सूर्यतेज पांघरलेली होती आणि तिच्या पायांखाली चंद्र व तिच्या मस्तकावर बारा ताऱ्यांचा मुकुट होता. प्रकटीकरण १२:१

देवाची मंडळी तिच्या देवाच्या समयाने परिधान केलेली आहे. सूर्य, चंद्र आणि तारे हे सर्व प्रभूच्या उपस्थितीतून येणाऱ्या विश्रांतीच्या/ताजेतवानेपणाच्या ऋतूंचे निर्धारण करण्यासाठी दिलेले आहेत. पौल याच विषयाकडे इशारा करतो जेव्हा तो थेस्सलनीकांस लिहितो:

बंधूंनो, काळ व समय ह्यांविषयी तुम्हांला काही लिहिण्याची गरज नाही. १ थेस्सलनीकांस ५:१

येथील "समय" हा शब्द तोच ग्रीक शब्द आहे जो ग्रीक जुन्या करारात उत्पत्ति १:१४ मध्ये वापरला आहे जो मूळ हिब्रूतील म्ओएद (moéd) या शब्दाशी जुळतो.

म्हणून, प्रकटीकरण १२ मध्ये जशी देवाची मंडळी प्रगट केली आहे ती देवाच्या प्रेमाच्या प्रकाशाने अलंकृत आहे. हे प्रेम विश्रांतीच्या ऋतूंमध्ये प्रकट होते जे शब्बाथ सात सिद्धांतानुसार सातांनी मोजल्या जाणाऱ्या काळांशी निगडित आहेत. शब्बाथ तोच समय आहे ज्यात पित्याने आपल्या पुत्राविषयी आपला सर्वोच्च आनंद प्रकट केला. आपण हेच वस्त्र हा प्रेमाचा प्रकाश प्रेषित योहानाच्या अंगावर पाहतो, जेव्हा तो म्हणतो:

आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतीदान दिले आहे पाहा; आणि आपण तसे आहोतच. ह्यामुळे जग आपल्याला ओळखत नाही, कारण त्याने त्याला ओळखले नाही. १ योहान ३:१

हेच ते आश्वासनाचे वस्त्र होते जे ख्रिस्ताने अरण्यात सैतानाचा सामना करताना परिधान केले होते. बाप्तिस्म्याच्या वेळी तो या आश्वासनाला धरून होता:

"हा माझा 'पुत्र', मला 'परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे." मत्तय ३:१७

देवाची मंडळी कोकराच्या रक्ताने म्हणजे बलिदानाने आणि त्यांच्या साक्षीच्या शब्दांमुळे विजयी ठरते; आणि त्यांची साक्ष हीच असते की ते खरेखुरे देवाची लेकरे

आहेत पित्याने प्रेम केलेले. ही साक्ष त्यांना विशेष रीतीने शब्बाथाच्या सात सिद्धांतामध्ये प्राप्त होते.

म्हणून, जर आपण परत सूर्य आणि चंद्र यांच्या समुद्रातील लाट-ओहोटीशी असलेल्या परस्परसंबंधाकडे पाहिले, तर आपल्याला दिसते की आठवड्याचा शब्बाथ हा पृथ्वीच्या संदर्भात सूर्याच्या सातव्या प्रदक्षिणेची गणना करून पाळला जातो. वार्षिक उत्सव हे वर्षातील पहिल्या सात महिन्यांमध्ये येतात आणि त्याकरिता पृथ्वीच्या संदर्भात चंद्राच्या सात चक्रांची गणना करावी लागते. जर सूर्य आणि चंद्र यांचा समुद्रातील भरतीवर असा प्रभाव असेल, तर असेही होऊ शकते का की आठवड्याचा शब्बाथ एखाद्या वार्षिक उत्सवाच्या (उदा. वलांडण व मंडपांचा उत्सव) काळात आला, तर त्या दिवशी आत्मिक आशीर्वादांची भरती अधिक उंच येत असेल?

तो तयारीचा दिवस होता, म्हणून शब्बाथ दिवशी शरीरे वधस्तंभावर राहू नयेत (कारण तो शब्बाथ मोठा दिवस होता), म्हणून त्यांचे पाय मोडावेत आणि त्यांना घेऊन जावे अशी यहूद्यांनी पिलाताला विनंती केली. योहान १९:३१

ख्रिस्ताचे वधस्तंभावर खिळणे शुक्रवारी झाले तोच वल्हांडणाचा दिवस. त्यानंतरचा दिवस हा सातव्या दिवसाचा शब्बाथ होता, आणि त्याच वेळी बेखमीर भाकरीच्या उत्सवाचा पहिला दिवस होता. योहानाने ह्याला मोठा शब्बाथ असे म्हटले. हा एक आठवडी शब्बाथ होता, जो वार्षिक उत्सवाशी संलग्न झाला होता. ग्रीक शब्दाचा अर्थ "महान, मोठा किंवा जोरदार" असा देखील होतो. तर मग असे होऊ शकते का की, जेव्हा शब्बाथ एखाद्या उत्सवाबरोबर जुळतो, तेव्हा आपल्या पित्याचा आवाज आपल्या मुलांशी अधिक जोराने बोलत असेल आणि आपण त्याच्या बोलावणीला प्रतिसाद दिला तर तो आवाज आपल्या हृदयात अधिक खोलवर पोहोचत असेल? जसे समुद्राची भरती नविनचंद्र किंवा पौर्णिमेला अधिक उंच येते, तसे या दिवसांत आत्मिक भरती पवित्र आत्म्याचा आवाज आपल्या आत्म्यात अधिक तीव्रतेने बोलत असेल का?

प्रकटीकरण १२ मधील स्त्री चंद्रावर उभी आहे. आणि स्तोत्रकार आपल्याला सांगतो:

त्याने कालमान समजण्यासाठी चंद्र नेमला; सूर्य आपला अस्तसमय समजून घेतो. स्तोत्र १०४:१९

परमेश्वराने चंद्राला (कालमान) ऋतूंसाठी, म्हणजे म्‌ओएद नेमलेल्या वेळांसाठी ठरवले आहे. जेव्हा आपण पित्याच्या आवाजाकडे त्याच्या नियुक्त वेळांनुसार लक्ष देतो, तेव्हा त्याचा आवाज आपल्याला अधिक स्पष्ट, अधिक प्रभावी ऐकू येतो आणि तो आपल्याला म्हणतो: "तू माझे प्रिय लेकरू आहेस; तू माझ्या आनंदाचे कारण आहेस."

हे सर्व काही पित्याच्या आणि पुत्राच्या नात्याशी पूर्णतः सुसंगत आहे. जसा देवपुत्र पित्याच्या तेजाचा प्रकाश आहे, तशाच रीतीने वार्षिक नियुक्त वेळा त्या ऋतू साप्ताहिक नियुक्त वेळी, म्हणजेच शब्बाथाला, ख्रिस्ताद्वारे पित्याचे आपल्यावर असलेले प्रेम अधिक उजळ करतात. या सिद्धांताबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी द डिव्हाईन पॅटर्न ऑफ लाईफ हे पुस्तक पहा.

जर प्रेषित योहानाने बेखमीर भाकरीच्या पहिल्या दिवसाचा आणि शब्बाथाचा एकत्र आल्यामुळे मोठा दिवस असे म्हटले असेल, तर त्यात "मोठेपणा" नक्की कोणत्या गोष्टीचा आहे? तो मूळात शब्बाथाच्या हेतूतच आहे की पित्याचा आशीर्वाद त्या दिवशी अधिक प्रमाणात आपल्या मुलांवर मोकळा होतो. स्वतः अनुभवून पाहा चाखा आणि पहा.

योहानाच्या एका शिष्याने आपल्याला प्रेषित योहान काय मानत होता याचे एक चित्र दिले आहे. योहान असा मानत होता की वल्हांडण पाळणे हे सुवार्तेचा एक भाग आहे.

पोलीक्रातेस म्हणतो: "म्हणूनच आम्ही हा दिवस प्रामाणिकपणे पाळतो न त्यात काही वाढ करतो, न त्यातून काही कमी करतो कारण आशिया (लघुउत्तर) प्रांतात महान तेजस्वी दिवे निजले आहेत, आणि प्रभू गौरवाने स्वर्गातून येईल त्या दिवशी ते पुन्हा उठतील आणि सर्व संतांना शोधून काढतील. अशाचांपैकी फिलिप... व त्याच्या दोन कन्या... [पृ. ५०७] आणि प्रभूच्या कुशीत विसावलेला योहान... तसेच स्मिर्नाचा पोलीकार्प जो बिशपही होता आणि शहीदही आणि युमेनेआचा थ्रेसेआस जो बिशपही आणि शहीदही होता... [तसेच] सगारीस,... पापिरियस,... आणि मेलिटो... ह्यापैकी सर्वांनी सुवार्तेनुसार चौदावा वल्हांडण दिन अखंडपणे पाळला कधीही विचलित न होता तर विश्वासाच्या नियमाप्रमाणे चालत. आणि मीही, पोलीक्रातेस, तुमच्यातला सर्वांत क्षुद्र, माझ्या नातलगांच्या परंपरेनुसार जगतो,

आणि त्यांपैकी काहींचा मी पाठपुरावा केला आहे. कारण माझ्या घरातील सातजण बिशप होते आणि मी आठवा आहे; आणि माझ्या नातलगांनी कायमच तो दिवस पाळला ज्या दिवशी लोक खमीर दूर करीत. म्हणून बंधूंनो, मी जो प्रभूमध्ये पासष्ट वर्षे जगलो आहे, आणि जगभरातील बंधूंशी संवाद साधला आहे, आणि सर्व पवित्र शास्त्रांचे अध्ययन केले आहे मला धमक्या वाटत नाहीत; कारण ज्येष्ठ व महान लोक म्हणाले आहेत, 'मनुष्यापेक्षा देवाचे ऐकणे अधिक योग्य आहे.'" एसडीए बायबल कमेंटरी, खंड ९, पृष्ठ ३६२

जेव्हा तुम्ही हे स्वीकारता की पित्याचा आनंद हा ख्रिस्ताद्वारे, शब्बाथाच्या सात सिद्धांतामध्ये, त्याच्या लेकरांना दिला जातो, तेव्हा प्रभूच्या सर्व नियुक्त वेळांकडे सुवार्तेचाच एक भाग म्हणून पाहणे अगदी सहज होते.

अनेक जण असे मानतात की प्रभूचे उत्सव जे मोशेच्या काळात दिले गेले ते क्रूसापूर्वी जगणाऱ्यांसाठी प्रत्यक्ष आत्मिक उत्सव नव्हते. त्यांच्या मते हे उत्सव फक्त शेकडो वर्षांनी येणाऱ्या ख्रिस्ताच्या कार्याचे प्रतीक होते. पण अशी धारणा ही क्रूसापूर्वी सुवार्तेत कार्य करणाऱ्या ख्रिस्ताच्या कार्यालाच नाकारणारी आहे आणि मोशेच्या चेहऱ्यावर चमकणारा कालवरीचा प्रकाश पुसून टाकते. विश्रांती मिळवण्याचा एकच मार्ग आहे तो म्हणजे ख्रिस्ताच्या आत्म्यामधून मिळणारी विश्रांती. खालील सर्व शास्त्रवचने ह्याच विश्रांतीविषयी बोलतात ख्रिस्तामध्ये पित्याच्या आनंदात विश्रांती घेण्याविषयी.

तो त्यांना म्हणाला, "परमेश्वराचे सांगणे असे आहे की, उद्या विसाव्याचा दिवस, परमेश्वराचा पवित्र शब्बाथ [H7677 — शब्बाथोन] आहे; तुम्हांला भाजायचे ते भाजा आणि शिजवायचे ते शिजवा. जे काही उरेल ते आपल्यासाठी सकाळपर्यंत ठेवा." निर्गम १६:२३

सहा दिवस काम करावे, पण सातवा दिवस परमेश्वराचा पवित्र दिवस, परमविश्रामाचा शब्बाथ [H7677 — शब्बाथोन] होय; कोणी शब्बाथ दिवशी काम करील तर त्याला अवश्य जिवे मारावे. निर्गम ३१:१५

कारण त्या दिवशी तुम्हांला शुद्ध करावे म्हणून तुमच्यासाठी प्रायश्चित्त करण्यात येईल; परमेश्वरासमोर तुम्ही आपल्या सर्व पापांपासून शुद्ध ठराल. तुमच्यासाठी हा परमविश्रामाचा शब्बाथ [H7677 — शब्बाथोन] होय; ह्या दिवशी तुम्ही आपल्या

जिवांस दंडन करावे; हा निरंतरचा विधी होय. लेवीय १६:३०–३१

“इस्राएल लोकांना सांग : सातव्या महिन्याची प्रतिपदा तुम्हांला परमविश्रामाची [H7677 — शब्बाथोन] असावी; स्मरण देण्यासाठी त्या दिवशी रणशिंगे फुंकावीत व पवित्र मेळा भरवावा. लेवीय २३:२४

जमिनीचा उपज गोळा केल्यावर त्याच सातव्या महिन्याच्या पंधराव्या दिवसापासून पुढे सात दिवसपर्यंत परमेश्वराप्रीत्यर्थ सण पाळावा; पहिला दिवस व आठवा दिवस हे परमविश्रामदिन [H7677 — शब्बाथोन] होत. लेवीय २३:३९

वरील प्रत्येक नियुक्त वेळेसाठी शब्बाथोन हा शब्दच वापरलेला आहे हे लक्षात घ्या. येथे “विश्रांती” हा जो शब्द आहे तोच ख्रिस्तामध्ये मिळणारा खरा विश्राम आहे. ख्रिस्ताबाहेर शब्बाथ मानणे किंवा विश्राम मिळवणे अशक्य आहे.

अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन. मत्तय ११:२८

येथे “विसावा” हा जो शब्द ख्रिस्त वापरतो, तोच ग्रीक भाषेतील शब्बाथोन या शब्दाचा समर्थक आहे. म्हणूनच चौथी आज्ञा खरीखुरी फक्त सुवार्तेमध्येच पाळली जाऊ शकते ती अशी सुवार्ता जी ख्रिस्ताच्या आत्म्याद्वारे आपल्या जीवनात पित्याचा आनंद उघड करते.

## शब्बाथ अधिक पूर्णपणे

मी जन्मापासून शब्बाथ पाळणारा आहे. माझ्या आयुष्यातील या सर्व काळात मी मंडळीच्या सभांना उपस्थित राहत आलो आहे. शब्बाथ हा प्रभूसोबत संगती करण्याचा एक विशेष समय आहे तो त्याचा विशेष दिवस आहे असे मला सांगितले गेले. पण या सर्व काळात एकदाही मला हे समजावून सांगितले गेले नाही की शब्बाथ हा प्रत्यक्षात पवित्र आत्म्याचा एक विशेष आशीर्वाद आहे. शब्बाथाशी संबंधित ए. टी. जोन्स यांच्या लेखनाचा मी अभ्यास केला तेव्हा त्यांच्या एका प्रवचनात मला

पुढील विधान आढळले:

“हा दिवस पवित्र कशामुळे झाला?” (मंडळी: “देवाच्या उपस्थितीमुळे.”) देवाची उपस्थिती वस्तूंना पवित्र करते. ती एखाद्या स्थळाला पवित्र करते. ती एखाद्या मनुष्याला पवित्र करते. देवाच्या उपस्थितीनेच तो दिवस पवित्र झाला. म्हणजे देवाची पवित्रता त्या दिवशी जोडली गेली. देवाची उपस्थिती ही पवित्र उपस्थिती सातव्या दिवसाशी, म्हणजे शब्बाथाशी जोडलेली आहे. तर मग मनुष्य जेव्हा त्या दिवशी येतो जसा तो येऊ शकतो तसा त्याच्या आत्मिक मनोवृत्तीने, देवाच्या आत्म्याच्या मनोवृत्तीने; आणि त्या दिवसात असलेला आत्मिक विश्राम, त्यातील आत्मिक ताजेतवानेपणा, त्यातील आत्मिक आशीर्वाद स्वीकारतो तेव्हा तो त्या उपस्थितीलाही स्वीकारत नाही काय? त्या उपस्थितीचा तो सहभागी होत नाही काय? आणि त्या उपस्थितीत आहे ती देवाची पवित्रता, जी मनुष्याला बदलते तो त्याचा भागीदार होत नाही काय? होय, नक्कीच होतो. आणि हेच म्हणजे खरे शब्बाथ पाळणे आहे.

तर मग त्याने त्या दिवसाला पवित्र केले पण मला त्या संदर्भातील ग्रंथवचने पुन्हा सांगण्याची गरज नाही. पवित्र कोण करते? (मंडळी: “देवाची उपस्थिती.”) मग देवाची उपस्थिती त्याची पवित्र करणारी शक्ती सातव्या दिवशी आहे. ते खरे आहे काय? (मंडळी: “होय.”) मग जो मनुष्य प्रभूच्या शब्बाथाकडे येतो प्रभूने शब्बाथाकरिता जे नियम ठेवले त्यानुसार तर तो आत्मिक विश्राम प्राप्त करतो. त्याला त्या दिवशी तो विश्राम सापडतो. त्याला आत्मिक ताजेतवानेपणा मिळतो. आनंद मिळतो. त्याला आत्मिक आशीर्वाद मिळतो. त्याला देवाची उपस्थिती मिळते आणि तिच्यासोबत येणारी पवित्रता, जी मनुष्याला बदलते. आणि त्याला त्या उपस्थितीतच ती पवित्रीकरणाची शक्ती मिळते, ज्या शक्तीने त्या दिवसाला पवित्र केले आणि जी आता त्या मनुष्यालाही पवित्र करते.

हे सर्व काही कोणत्या हेतूसाठी करण्यात आले? शब्बाथ का निर्माण करण्यात आला? (मंडळी: “मनुष्यासाठी.”) तो मनुष्यासाठी निर्माण केला गेला. तर मग देवाने विश्राम घेतला आणि आपला आत्मिक विश्राम त्या दिवशी ठेवला हेही मनुष्यासाठी, नाही काय? (मंडळी: “होय.”) देवाचा ताजेतवानेपणा, त्या दिवशीचा त्याचा आनंद हे सर्व मनुष्यासाठीच होते. त्याने त्या दिवशी जो आशीर्वाद ठेवला तोही मनुष्यासाठी होता. त्याच्या उपस्थितीने त्या दिवशी आली ती पवित्रता तीही मनुष्यासाठी होती.

आणि त्याच्या उपस्थितीने त्या दिवशी आलेले पवित्रीकरण तेही मनुष्यासाठीच होते. मग हे सारे याकरिताच नव्हते काय की मनुष्य शब्बाथाद्वारे देवाच्या उपस्थितीचा भागीदार व्हावा, आणि जगत्या अनुभवातून देवाच्या आत्मिक विश्रामाशी, आत्मिक आशीर्वादाशी, पवित्रतेशी, आणि पवित्र करणाऱ्या उपस्थितीशी परिचित व्हावा? देवाने शब्बाथाचा मनुष्यासाठी जो उद्देश ठेवला तो हाच नाही काय? आणि जो मनुष्य शब्बाथात हे सर्व अनुभवतो तोच मनुष्य खरोखर शब्बाथ पाळणारा आहे. आणि त्याला हे ठाऊक असते. तो हे जाणतो आणि हे जाणून तो आनंदित होतो.

आता आणखी एक गोष्ट: निर्मितीच्या कार्यात प्रत्यक्ष कार्यकर्ता कोण होता? (मंडळी: "ख्रिस्त.") कोणी विश्राम केला? (मंडळी: "ख्रिस्त.") कोण ताजेतवाने झाला? (मंडळी: "ख्रिस्त.") कोणी आशीर्वाद दिला? (मंडळी: "ख्रिस्त.") कोणाची उपस्थिती त्या दिवशी पवित्रता घेऊन आली? (मंडळी: "ख्रिस्ताची.") त्या दिवशी कोणाची उपस्थिती असते? (मंडळी: "ख्रिस्ताची.") तर आता, ज्याला येशू ख्रिस्ताची उपस्थिती पवित्र करत नाही, ज्याला ती उपस्थिती पवित्र बनवत नाही, आणि ज्याला ती आशीर्वाद देत नाही, आणि ज्याला ती विश्राम आणत नाही तो मनुष्य शब्बाथ पाळूच शकत नाही. हे दिसत नाही काय की मनुष्यात ख्रिस्त असला तरच शब्बाथ पाळला जाऊ शकतो? कारण शब्बाथ घेऊन येणे आणि स्वतःमध्ये बाळगून ठेवणे हे ख्रिस्ताच्या उपस्थितीद्वारेच होते. — ए. टी. जोन्स, जनरल कॉन्फरन्स बुलेटिन, प्रवचन २०, इ.स. १८९३

तर खरोखरच, प्रत्येक दिवशी एक विशेष आशीर्वाद येतो. तो सकाळच्या आणि संध्याकाळच्या बलिदानाबरोबर येतो. आपल्यासाठी आज याचा अर्थ असा की आपल्या तारकाच्या बलिदानाची जाणीव ठेवून, आपल्या पित्याची देणगी प्राप्त करण्याकरिता सकाळची आणि संध्याकाळची उपासना करणे आवश्यक आहे.

प्रत्येक कुटुंबात सकाळच्या आणि संध्याकाळच्या उपासनांसाठी एक निश्चित समय असला पाहिजे. उपवास मोडण्यापूर्वी पालकांनी आपल्या मुलांना जवळ बोलावून, रात्रीभर त्याच्या रक्षणाबद्दल स्वर्गीय पित्याचे आभार मानणे, आणि दिवसातील मदत, मार्गदर्शन आणि काळजीसाठी त्याच्याकडे विनंती करणे यापेक्षा योग्य काय असू शकते? आणि संध्याकाळी, दिवस पूर्ण होत असताना, पुन्हा एकदा पालक आणि मुले त्याच्यासमोर येऊन मागील दिवसातील सर्व आशीर्वादांसाठी धन्यवाद

करणे हे किती शोभनीय आहे! चाइल्ड गाईडन्स, ५२०.१

